# राजारामशास्त्री भागवत यांची स्वराज्याची संकल्पना

**श्रावण धोंडीराम पाटील,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मो.नं. ९६३७२०३५३७ **ई—मेल shravanpatil83@gmail.com**

..........................................................................................................

**प्रस्तावना**

'स्वराज्य' हा शब्द भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून प्रकाशात आला असला तरी स्वराज्याची खरी जाणीव छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या रयतेस करून दिली. त्यांच्या मते, स्वराज्य म्हणजे स्वत:चं, तमाम जनतेचं राज्य होय. आणि यासाठी त्यांनी कोणत्याही जाती—धर्माचं स्थान बळकट केलं नाही. स्वराज्याला विरोध करणारा माणूस, मग तो कोणत्याही जाती—धर्मातील असला तरी तो स्वराज्याचा शत्रू आहे असेच छत्रपती शिवरायांनी मानले. त्याचपद्धतीने भारतीय समाजातील धर्म, वंश, जात, लिंग, पारंपारिक अनिष्ट रूढी, प्रथा—परंपरा हे देखिल शत्रू आहेत. कारण स्वराज्यासाठी वा एकसंध राष्ट्रासाठी समाजात ऐक्य असणे आवश्यक आहे. भारतीय समाजात एकात्मता निर्माण होण्याऐवजी धर्मभेद, जातीभेद, वर्णभेद अस्तित्वात होते. म्हणजेच सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक प्रश्न मोठया प्रमाणात डोके वर काढत होते. उच्च वर्णियांचे समाजाच्या सर्वच क्षेत्रांत प्राबल्य निर्माण झाल्याने कनिष्ट वर्गीयांवर (बहुजन जनतेवर) अन्याय होऊ लागला होता. त्यांना समाजात हीनत्वाची वागणूक मिळू लागल्याने उच्च वर्णीय आणि कनिष्ट वर्णियांत मोठी दरी निर्माण झाली. आणि यातूनच ब्राह्मण—ब्राह्मणेत्तर संघर्ष उदयास आला होता.

भारतीय स्वराज्यात शोषित, पीडीत, दबलेल्या, शिक्षणाचा अभाव असलेल्या वर्गावर उच्च वर्णियांकडून अन्याय होत होता. त्यामुळे तत्कालीन समाज अशा अन्यायाने त्रस्त होता. याची जाणीव प्रथम महात्मा फुलेंनी करून दिली. आणि याचे कार्य सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सुरू केले. पुढे त्यांचा हा वारसा राजारामशास्त्री भागवत व राजर्षी शाहु महाराज यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीतून पुढे चालवला.

राजारामशास्त्री भागवत हे १९ व्या शतकातील कर्ते समाजसुधारक. त्यांना जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता मान्य नव्हती. त्यांना वेदांची प्रचंड आवड होती. त्यांच्या मते, समाजातील सर्व घटकांना (स्त्री—पुरूषांना) वेद व गायत्री मंत्र म्हणण्याचा समान अधिकार आहे. परंतु उच्च वर्णियांना हे मान्य नव्हते. त्यांच्या मते, फक्त क्षत्रियांनाच वेद पठण करण्याचा अधिकार आहे. यातूनच ब्राह्मण—ब्राह्मणेत्तर संघर्ष वाढीस लागला. राजारामशास्त्री भागवतयांच्या मते, स्वराज्य जर निर्माण व्हायचे असेल तर दलित, शेतकरी, कष्टकरी यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. या सर्वांशिवाय स्वराज्य निर्माण होऊ शकत नाही. राजारामशास्त्री भागवतयांनी ब्राह्मणेत्तरांचे मागासलेपण दूर होण्यासाठी ब्राह्मणेत्तर चळवळीच्या माध्यमातून त्यांचे हक्क व अधिकार यांविषयी समाजात जागृती घडवून आणली. त्यांचा'ब्राह्मण्यवादास' विरोध होता पण 'ब्राह्मण' असण्यास विरोध नव्हता. राजारामशास्त्री भागवत यांनी खरे स्वराज्य स्थापन होण्यासाठी ब्राह्मणेत्तरांच्या उद्धाराची आवश्यकता असल्याचे मत मांडले आहे. त्यादृष्टिने या शोधनिबंधात राजारामशास्त्री भागवत यांच्या ब्राह्मणेत्तर चळवळीतील कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**राजारामशास्त्री भागवत यांचे ब्राह्मणेत्तर चळवळीतील कार्य**

राजारामशास्त्री भागवत हे ब्राह्मणेत्तरांत आदराचे स्थान असलेले एक समाजसुधारक होते. कारण महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर ब्राह्मणेत्तर चळवळीची सर्व सुत्रे काही काळ राजारामशास्त्री भागवतांनी हलविली होती. याचे विवेचन रमेश चव्हाण यांनी संपादीत केलेल्या 'महाराष्ट्राचे उपेक्षित राजारामशास्त्री भागवत एक दर्शन' या पुस्तकांमध्ये केले आहे. महात्मा फुलेंनी दलितांना 'अस्पृश्य किंवा शुद्रातिशुद्र' असा शब्दप्रयोग वापरला त्याच अस्पृश्यांना राजारामशास्त्री भागवतांनी 'ब्राह्मणेत्तर' हा शब्द वापरला. यातुन त्यांच्या नावावरून होणारा अपमान दूर होण्यास मदत झाली. ब्राह्मणेत्तरांच्या मागासलेपणास गरीबी, दारिद्रय व अज्ञान जबाबदार असून हे दूर झाल्याशिवाय स्वराज्य स्थापन होणार नाही. असा त्यांनी विचार मांडला होता. समाजात असणारा न्याय व अन्याय यांचा विचार करून त्यांनी बहुजन समाजाची बाजु उचलून धरली. त्यांच्या मते, माणसाचा

विशिष्ट जातीत जन्म होत असला तरी त्याची योग्यता ही त्याच्या कर्तृत्वानेच ठरते. त्यामुळे जातीभेद, अस्पृश्यता पाळणे त्यांना पसंत नव्हते. त्यांच्या मते, ब्राह्मण व ब्राह्मणेत्तरांनी एकमेकांबद्दल द्वेष निर्माण करणे यात शहाणपण नसून सेवा, त्याग, समर्पित बुद्धी, कळकळ व मानवतावादी दृष्टी या गोष्टींची जोपासना करावी व त्याप्रमाणे आचरण करावे. त्यांनी त्यांच्या लिखाणातून ब्राह्मण—ब्राह्मणेत्तरांच्या जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव करून दिली.

राजारामशास्त्री म्हणतात की, स्वराज्यासाठी आपण जे हक्क इंग्रजांकडे मागतो ते हक्क आपण इतरांना म्हणजेच ब्राह्मणेत्तरांना द्यावे. सर्वांना समान संधी द्यावी. त्यामुळे प्रत्येकालाच स्वातंत्र्य, न्याय, हक्क, समता या तत्त्वांबद्दल आदर निर्माण होवून समाज एकसंध राहील (चव्हाण रा. ना., २०११:११). त्यामुळे स्वराज्य निर्माण होण्यास मदत होईल. भागवतांना वेद हे प्रिय होते. त्यांचे असे मत होते की, फक्त ब्राह्मणांना वेद म्हणण्याचा अधिकार नसून सर्व मानवजातीला (स्त्री—पुरूषांना) वेद म्हणण्याचा अधिकार आहे. यासाठी ते दरमहा मुंबईहून कोल्हापूर, बेळगाव येथे येऊन मराठा विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र व वेद म्हणावयास शिकवत असत (चव्हाण रा. ना., २०११:१०). समाजातील प्रत्येकालाच न्याय तत्त्वानुसार समान दर्जा असला पाहिजे यावर त्यांचा भर होता.

वेद हे सर्व जाती व वर्गातील लोकांना म्हणण्याचा समान अधिकार आहे. पण काही धर्मभावनेने जास्त आसुसलेले ब्राह्मण लोक याला विरोध करत होते. या बाबतीत कोल्हापूर संस्थानचे राजे छ. शाहू महाराज यांच्या जीवनात घडलेले वेदोक्त प्रकरण महत्त्वाचे आहे. छत्रपती शाहू महाराज कार्तिक महिन्यात दररोज पंचगंगा नदीघाटावर अभ्यंगस्नानासाठी जात होते. एके दिवशी त्यांच्या सोबत त्यांचे धाकटे बंधू बापुसाहेब घाटगे, मामासाहेब खानविलकर, अतिथी म्हणून आलेले मुंबईचे बंडखोर समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत आणि उपाध्याय नारायण भटजी होते. छ. शाहू महाराजांच्या स्नानाच्या वेळी नारायणशास्त्री भटजी जे मंत्र म्हणत होता ते पुराणातील होते. शाहू महाराज हे क्षत्रिय कुलातील असूनही हा भटजी पुराणोक्त मंत्र का म्हणत आहे, आणि तेही स्नान न करता याविषयी राजारामशास्त्री भागवतांनी नारायण भटजीस विचारले की, ''आपण वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र का म्हणत आहात.''शाहु महाराजांनाही त्याची कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांनीही नारायण भटजीस विचारले तेव्हा नारायण भटजी म्हणाला की, ''शुद्रांसाठी पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात. वैदीक मंत्र म्हणतेवेळीच स्नानाची आवश्यकता असते. परंतु शुद्रांना पुराणोक्त पद्धतीचा वापर करावयाचा असल्यामुळे मला स्नान करण्याची आवश्यकता नाही.'' (कीर धनंजय, १९७०:४२). आणि येथून पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीने जोर धरला. त्यास शाहु महाराजांनी पाठबळ दिले. त्याचे नेतृत्व केले.

राजारामशास्त्री भागवतांनी अस्पृश्योद्धारासाठी खूप कष्ट घेतले. सनातनी वृत्तीच्या लोकांकडून त्यांच्यावर मोठया प्रमाणात टीकाही झाली. पण त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. वेदांमध्ये, उपनिषदांमध्ये अस्पृश्यतेला मान्यता नाही (भागवत दुर्गा, खंड ६, १९७९:३०). त्यामुळे अस्पृश्यता पाळणे मानवता विरोधी आहे हे स्वत: कृतीतून दाखवून देतात. ते भर 'रस्त्यात उभे राहून इराण्याचा चहा व पाव खात. महारांकडे फराळ करीत. हातात पैसा ठेवून झाडूवाल्याला तू हा माझ्या हातातून उचलून ने असे म्हणत. एकनाथ षष्ठीच्या दिवशी महारांच्या मुलांना स्वत: खाऊ वाटीत व पुस्तके देत (भागवत दुर्गा, खंड ६, १९७९:३१—३२). अस्पृश्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांना शिष्यवृत्त्या देत. पुस्तकांबरोबरच इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत (चौसाळकर अशोक, २०११:५७). राजारामशास्त्री भागवत हे 'संत एकनाथ व संत तुकाराम यांसारख्या संतांच्या जन्मदिवशी अस्पृश्यांना आपल्या घरी जेवणास बोलवत असत.' (चौसाळकर अशोक, २०११:५६). राजारामशास्त्री भागवत यांनी वऱ्हाडात ब्राह्मणेत्तरांत जागृती करण्यासाठी व संघटना निर्माण करण्यासाठी दौरा काढला होता. त्यांच्या प्रयत्नामुळे वऱ्हाडात शिक्षण परिषदा भरविण्यात आल्या होत्या. व १९११ साली त्यांच्या मृत्यूनंतर पहिली सत्यशोधक परिषद भरली होती (चव्हाण रा. ना., २०११:६२). जातीभेद मोडणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. स्वराज्य स्थापन करण्याचे कार्य कोणत्याही एका जातीचे नाही. यासाठी ते उदाहरण देतात ते म्हणजे शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे कारण त्या स्वराज्यात सर्व जाती—धर्मांना स्थान होते (चौसाळकर अशोक,

जानेवारी—मार्च २०१५:१०५). स्वराज्याची खरी शक्ती ही एकसंध समाजात अधिक असते. असे राजारामशास्त्री भागवतांच्या सांगण्याचा हेतू होता.

ब्राह्मणेत्तर मंडळी सत्यशोधक पद्धतीने विवाह करताना त्यात ब्राह्मण पुरोहितांना स्थान नव्हते. याबाबत भागवत त्यांचे अभिनंदन करताना म्हणतात की, ''भटाशिवाय लग्न लावण्याची चाल पाडून तुम्ही अतिप्राचीन काळच्या आपल्या पूर्वजांचा कित्ता गिरवत्ता हे पाहून आम्हांस फार संतोष होतो. पण याचबरोबर ते इशाराही देतात की, भट्टाशिवाय दुसरी कोणतीतरी जात उत्पन्न करण्याकडे तुमच्या मनाचा ओघ जाऊ नये.'' (मोरे सदानंद: २०१३:७५). अशा प्रकारे एका जातीतून दुसरी पोटजात निर्माण होत जाते, त्यामुळे समाजात असंख्य जाती निर्माण होतात. त्यामुळे जाती—जातीतील संघर्ष उद्‌भवून समाज अशांत बनतो.

**समारोप**

इंग्रजांच्या जागी भारतीय राज्यकर्ते आले पण तेही उच्च वर्गातील, आर्थिक स्थितीने भक्कम असणारा वर्ग सत्तेच्या केंद्रभागी आहे. त्यामुळे समाजाचा समतोल साधला जात नाही. समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक प्रश्न सोडविल्याशिवाय स्वराज्य स्थापन होण्यास मदत होणार नाही. भारतीय समाजात असणारी शोषणावर आधारीत समाजव्यवस्था बदलल्याशिवाय खरे स्वरज्य येणार नाही. आज समाजातील प्रत्येक घटकाच्या समस्या उद्‌भवताना दिसतात. या समस्या सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती प्रबळ असेल तरच या समस्या सोडविण्यास मदत होवू शकते. धर्म, जात, वंश, वर्ग, गरीब—श्रीमंत, प्रांत, भाषा यांमधील मानसिक दुरावा आणि यातील मत्सर दुर झाल्याशिवाय स्वराज्य निर्माण होणार नाही. यासाठी चांगल्या शिक्षणाच्या माध्यमातून प्रचार, प्रसार होणे आवश्यक आहे.

## संदर्भ

१) कीर धनंजय, (१९७०), प्रेषित राजर्षी शाहु छत्रपती (श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२) भागवत दुर्गा, (१९७९), राजारामशास्त्री भागवत निवडक साहित्य खंड ६, वरदा प्रकाशन, पुणे.

३) मोरे सदानंद, (२०१३), गर्जा महाराष्ट्र, सकाळ प्रकाशन, पुणे.

४) चव्हाण रा.ना., (२०११), महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी राजारामशास्त्री भागवत एक दर्शन, प्रकाशन—रमेश चव्हाण, पुणे.

५) चौसाळकर अशोक: (२०११), मेकर्स ऑफ इंडियन लिटरेचर राजारामशास्त्री भागवत, साहित्य अकादमी, दिल्ली.

६) चौसाळकर अशोक: (संपा.), (जानेवारी—मार्च, २०१५), समाज प्रबोधन पत्रिका, प्रकाशक, विलास वाघ, सदाशिव पेठ, पुणे.